नि.दि. अपील क्र. ०८/२०२४
राजाराम –वि– पुंडलिक हरमकर
MHBU11-000250-2024

## निशाणी क्र. ५ च्या अर्जावरील आदेश

१) सदरचा अर्ज आव्हानित हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस स्थगिती द्यावी, यासाठीचा आहे. एकमेव अपीलार्थी याचे कथन असे की, सध्या दावा मिळकत माझ्या ताब्यात आहे. जर हुकूमनामा धारकाने तो ताबा हिरावून घेण्याकरीता काही कारवाई केली तर हे अपील निष्फळ ठरेल. तरी तूर्त हुकूमनाम्याची अंमलबजावणी थांबवावी.

२) उत्तरवादीने या अर्जास त्याचे लेखी म्हणणे नि.क्र. १० ला दिले आहे. त्यात त्याचे कथन असे की, मूळ दाव्यात अपीलार्थीने असे लिहून दिले होते की, "शेत गट क्र. २३ ची संपूर्ण क्षेत्रफळाची मोजणी करण्यास माझी कोणतीही हरकत नसून, मोजणीमध्ये उत्तरवादी याची जमिन माझ्या कब्जात निघाल्यास मी त्याला ती परत देण्यास तयार आहे". त्याचे शेवटी कथन असे की, **हुकूमनाम्यानुसार अपीलार्थीच्या ताब्यातून ११ गुंठे परत मिळावेत यासाठी मी दरखास्त दाखल केली आहे.** तरी हा अर्ज फेटाळावा.

३) या कामी या अर्जावर ता. ०६/०७/२०२४ ला, असा आदेश झाला

आहे की, "अपिलार्थीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. पुढील तारखेला उत्तरवादीने युक्तीवाद न केल्यास मेरिटवर अर्जाचा निर्णय होईल".

४) आज संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत अनेकदा पुकारुन देखील उत्तरवादीची बाजू मांडण्याकरीता कोणीही फिरकले नाही. तसेच, मुदतीचा अर्ज देखील दिला नाही.

५) आव्हानित हुकूमनाम्यातील परिणामकारण आदेश क्र. २ आणि ३ असे आहेत की,

> "2. It is declared that, plaintiff is the owner of 0.84 HR land from Gut No. 23 situated at Ibrahimpur, Tq.Motala, Dist. Buldana.
>
> 3. Defendant shall deliver vacant possession of 0.11 HR land from Gut No. 23 to the plaintiff as shown in measurement map Exh.31 within three months of the decree."

६) उत्तरवादीने आपल्या लेखी म्हणण्यात परिच्छेद क्र. ६ मध्ये अशी स्पष्ट कबुली दिली आहे की, आव्हानित हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्याकरीता त्याने दरखास्त दाखल केली आहे. आव्हानित हुकूमनामा योग्य की अयोग्य ? वैध की अवैध ? बरोबर की चूक ? यावर या

न्यायालयाकडून शिक्कामोर्तब होण्याआधीच हुकूमनाम्याची अंमलबजावणी झाली तर, त्याविरुध्द केलेले अपील निरर्थक आणि निरुपयोगी होईल.

७) वरील सर्व कारणांचा एकत्र विचार करुन खालील आदेश केला आहे.

## आदेश

१. या आदेशाच्या परिच्छेद क्र. ५ मध्ये सविस्तर तपशिल असलेल्या आव्हानित हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीस या अपीलाचा अंतिम निकाल होईपर्यंत स्थगिती दिली आहे.

२. या अर्जाचा खर्च ज्याचा त्याने आपआपला सोसावा.

DISTRICT COURT, MAHARASHTRA

Digitally signed by SHRINIWAS VYANKATESH POTDAR
Date: 2024.08.09 16:13:37 +0530

मलकापूर.
दिनांक – ०९/०८/२०२४.

(श्री. व्यं. पोतदार)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश – १,
मलकापूर.

– – – – –

**प्रमाणपत्र**

मी खात्रीपूर्वक असे कथन करते की, पी.डी.एफ. फाईल मधील न्यायनिर्णय हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नांव | :- | तदर्थ जिल्हा न्यायाधीश - १, मलकापूर. |
| लघुलखेकाचे नांव | :- | कु. एच.डी. चौधरी. |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | :- | ०९/०८/२०२४. |
| न्यायिक अधिकारी यांनी न्यायनिर्णयावर सही केल्याचा दिनांक | :- | ०९/०८/२०२४. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०९/०८/२०२४. |